# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक १६

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांकः-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक ०६/०५/२०२५ दुपारी १२-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ३. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ४. | श्री.बाळासाहेब थत्तु | मुख्यलेखाअधिकारी |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्री महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| ९. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १०. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| ११. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १२. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १३. | श्री एन के बागुल | उप अभियंता , विद्युत विभाग |
| १४. | श्री.प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना विभाग |
| १५. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता, नगररचना विभाग |
| १६. | श्री.प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १७. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| १८. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| १९. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २०. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २१. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २२. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २३. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.
**मा.प्रशासकः-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१४८ जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत धुळे महानगरपालिकेच्या विविध पाणी पुरवठा केंद्र व जलकुंभासाठी सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणे व त्यासाठी वायफाय मॉनिटरीग सिस्टीम अस्थापीत करण्याच्या कामासाठी मा.जिल्हाधिकारी,धुळे यांच्याकडे निधी मागणीकामी प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता याकामी इस्टीमेशन यापुर्वी केले होते. आताचे सुधारीत इस्टिमेट पावणे दोन कोटीचे आहे. यात जे नविन जलकुंभाचे बांधकाम चालु आहे ते देखील यात समाविष्ट आहे. आणि सेंट्रलाईज मॉनिटरींग सिस्टीम केले आहे. आणी पोलिस विभागाकडुन TS घेतले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता जे एसपी ऑफिसने जे कॅमेरे बसविले असतील त्याचे TS ज्यांनी केलेले असेल त्याच यंत्रणेकडुन करुन घ्यावे. हे वर्कआऊट करुन TS ला पाठवुन द्या.सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४८ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे शहर हददवाढ क्षेत्रासहच्या पाणी पुरवठा केंद्र एकुण ८, मनपा जलशुध्दीकरण केंद्र एकुण ५, व पाणी पुरवठा जलकुंभ एकुण ३२ व एसटीपी केंद्र आहेत.सदरील पाणी पुरवठा केंद्रावरील धुळे शहरातील विविध नागरी भागामध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्था कार्यन्वीत आहे.सदरच्या सर्व पाणी पुरवठा केंद्रासाठी सदयास्थितीत कम्पांउन्ड वॉल पुर्ण पणे नाही.तसेच रात्रीच्या वेळी स्वंतत्र पणे वॉचमन नाही.

धुळे शहरातील पाणी पुरवठा नागरिकांच्या दृष्टीने संवेदनशील विषय आहे.सपुंर्ण पाणी पुरवठा केंद्राचे संचलन व परिक्षण पाहणी करीता व तसेच सुरक्षेच्या दृष्टीने याठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेर यंत्रणा बसविणे आवश्यक आहे.तसेच संपुर्ण जलकुंभावरील प्रक्षेपण वायफाय व्दारे एकत्रित करून सिंगल स्टेज मॉनिटरीग करणे चे काम आवश्यकतेचे आहे.सदरच्याकमी सर्वधारण एकत्रित खर्च सुमारे २ कोटी अपेक्षित आहे.परंतु मनपाच्या आर्थिक स्थितीनुसार सदरचे काम पुर्ण होणे शक्य नाही.

सदरच्या कामासाठी महासभा ठराव क्रं.२६२ दि.२५/७/२०२३ नुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत निधी मागणी प्रस्तावसाठी महासभा मान्यता प्राप्त आहे. सदरचे काम धुळे मनपासाठी आवश्यक असल्याने या कामी सन २०२५-२६ अंतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे पाठविण्याचे आवश्यक असल्याने नव्याने महासभा ठराव घेवुन मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव लक्षात घेता जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत धुळे महानगरपालिकेच्या विविध पाणी पुरवठा केंद्र, जलशुध्दीकरण केंद्र, मनपा जलकुंभासाठी तसेच एसटीपी

केंद्र यासाठी सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणे व त्यासाठी वायफाय मॉनिटरीग सिस्टीम अस्थापीत करण्याच्या कामासाठी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती, धुळे यांचेकडेस निधी मागणी प्रस्ताव आवश्यक तांत्रिक मंजुरीसह सादर करणेस मान्यता वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४९ धुळे मनपा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून श्री शुभम पटवारी यांची नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मे शुभम पटवारी यांनी आर्किटेक्ट पॅनेलवर घेण्याबाबत अर्ज केला होता. मा.आयुक्त महोदयांनी मे. शुभम पटवारी यांना सादरीकरण करण्याबाबत सांगण्यात आले होते. त्यांनी सादरीकरण करुन सदरचा विषय हा मे. महासभेपुढे आर्किटेक्ट पॅनेलवर नियुक्तीसाठी घेण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४९ दिनांक ०६/०५/२०२५**

मे.शुभम पटवारी, आर्कीटेक्ट हि फर्म आर्कीटेक्ट व्यवसायात कार्यरत आहे. ही फर्म धुळे महानगरपालिकेत आर्कीटेक्ट म्हणून काम करणेसाठी उत्सुक असल्याने त्यांनी धुळे मनपा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून नियुक्त करणे बाबत कळविले आहे.

म.आयुक्त तथा अप्रशासक , धुळे मनपा यांनी मे.शुभम पटवारी , आर्कीटेक्ट , धुळे यांनी केलेल्या कामाचे सादरीकरण सादर करणे बाबत या कार्यालया कडल पत्र क्र. / पापुवि./ 944 दि.27/02/2025 अन्वये कळविले होते.

त्यानुसार मे.शुभम पटवारी , आर्कीटेक्ट यांनी अर्बन रूट स्टुडियो, क्लिनिक , हॉटेल , कमर्शियल स्टोर्स ई. ठिकाणी आर्कीटेक्ट म्हणून काम केलेले असल्याची माहिती सादर केलेली आहे.

तरी धुळे मनपाचा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट नेमणूक करणे कामी मे.महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने मे.शुभम पटवारी , आर्कीटेक्ट , धुळे यांची धुळे मनपाचा आर्कीटेक्ट पॅनलवर नेमणूक करणे कामी प्रस्ताव महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव लक्षात घेता धुळे मनपा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून श्री शुभम पटवारी यांची शासन निर्णयातील दरानुसार नियुक्ती करण्यांस मान्यता मान्यता वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५० केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन 2025-26 अंतर्गत धुळे महानगरपालिका मार्फत गट नं.62/1 अवधान येथे अंदजित 15 मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी व तसेच शासन निर्णय क्र. दि.29 एप्रिल 2025 नुसार वीज देयकात बचत करण्यासाठी सौर उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत धोरण निश्चित करणे बाबतच्या निर्णयानुसार सादर करणे तसेच त्याअंतर्गत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपाच्या अवधान गट नं. ६२ या ठिकाणी सोलर प्रकल्प उभारणीसाठी यापुर्वीच महासभेचा ठराव झालेला आहे. केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुक विशेष सहाय्य योजना यासाठी आपल्याला सहभाग नोंदवायचा आहे. त्यासाठी मे. महासभेचा पुन्हा ठराव घेणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा ठराव करतांना व परवाचा जो जीआर निघाला आहे. त्यामध्ये जी ७०-३० ची प्रोव्हिजन ठेवली ती किंवा ज्या योजनेतुन पैसे मिळतील पण हा प्रस्ताव तयार करावा. त्याचे टीएस करुन सोलर पॅनेल मेढा कडुन व सिव्हील वर्क चे सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन सर्व मान्यता घेवुन याचा प्रॉपर डिपीआर करुन घ्यावा. डीपीआरच्या माम्पॅनलमेंटसाठी महाउर्जाला जे एम्पॅनल आहे. त्यांना घेता येईल. किंवा याचे टेंडर करता येईल. तो प्रस्ताव

सादर करणे व त्याला मान्यता घेणे व त्याचे इम्प्लीमेंटेशन करणे या सगळयाला मान्यता यामध्ये घेवुन टाकावी. आपली जी मागणी आहेती साधारण 20 मेगावॅटची आहे. होणारी एस्टॅबलीश होती ती कॅपॅसिटी त्या योजनेतील ती अडीच ते तीन मेगावॅटची आहे व हा 15 मेगावॅटचा प्रकल्प धरला तर जवळजवळ 17.5 मेगावॅट एस्टॅबलीश हीतील. अडीच मेगावॅटचा डेफिसिट राहील तो वरखेडी रोडवरील जागेत 2.5 मेगावॅटचा प्रोजेक्ट टाकता येईल. 130 कोटीपर्यंतचा अंदाजीत खर्च आहे. या 15 मेगावॅट प्रकल्पाचा ठरावानुसार मान्यता घ्या व पुढील महिन्याभरात प्रस्ताव मान्यतेसाठी तेथपर्यंत पोहचेल या पातळीपर्यंत पाठपुरावा ठेवुन कामे करुन घ्यावी. टप्पा क्रमांक 2 च्या बाबतीत पाठपुरावा करा. आपल्याला माझी वसुंधरा मध्ये जी बक्षीसे मिळतात 2.5 ते 3 मेगावॅटची कॅपॅसिटी इस्टॅबलीश होईल.सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५० दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिकाच्या सुखवद, बाभळे, हनुमान टेकडी, मालेगाव रोड, पांझरा वॉटर, बडगुजर जलकुंभ या पाणी पुरवठा केंद्राचे दरमहाचे वीज बिल सुमारे_2.00 कोटी आहे.तसेच म.न.पा क्षेत्रातील पथदिवे व इतर वीज बिल खर्च सुमारे 85 लक्ष प्रती माहे पर्यत खर्च होत आहे.याप्रमाणे या देयकांचे बिल खर्च रू.2.85 कोटी वीज बिल प्रती महा महावितरण कंपनीकडे अदा करणेत येते... महापालिकेच्या गट नं.62/1 अवधान एम.आय.डी.सी तलावाजवळ असलेल्या मोठ्या भुखंडावर व मनपा इमारतीवर सौर सयंत्र बसविणेसाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध आहे. या ठिकाणी ऑन ग्रिड सोलर सिस्टीम बसविल्यास अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतातून वीज निर्मिती होवुन मनपा त्या उपभोगातुन विज बिलाचा खर्च 100% भागवु शकते तथापी सदरच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे.धुळे मनपा ठराव क्र.137 दि.30/12/2021 च्या मंजुरी नुसार धुळे महानगरपालिकेच्या उपलब्ध जागेवर सोलर सिस्टीम बसविणे व प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी तंज्ञ सल्लागार नेमणे करीता महासभेने मंजुरी दिलेली आहे.धुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व पथदिवे व इतर विदयुत बिलावर साधारणः प्रती वर्ष 32 ते 35 कोटी खर्च होत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा केंद्रा वरील उच्च दाब विज बिलाचा खर्च अंर्तभुत आहे. उक्त प्रमाणे सोलर सिस्टीम उभारणी करून ऊर्जा निर्मिती करण्याच्या कामसाठी मोठया प्रमाणात भांडवली खर्चाची आवश्यकता आहे. तथापी महानगरपालिकेची स्वतःची आर्थिक परिस्थिती अशा खर्चासाठी अनुकुल नाही. केंद्र शासन किंवा महाराष्ट्र शासनाकडुन मोठया प्रमाणात ऊर्जा निर्मिती होणाऱ्या वाणीज्य व्यवसायीक प्रकल्पास असे अनुदान मिळण्याची संभावना कमी आहे.दि.02/05/2025 रोजी म. आयुक्त सो. यांच्या दालनात झालेल्या बैठकीत मा.अनुप अग्रवाल आमदार धुळे शहर व म.आयुक्त सो यांनी धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने व धुळे महानगरपालिकेकडुन प्रती वर्ष विज बिलावर होणारा खर्च बचत होण्याच्या दृष्टीने उपलब्ध गट नं.62/1 अवधान मनपा जागावर केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवलीगुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन 2025-26 अंतर्गत भाग-5 "औद्योगिक वाढीसाठी चालना" अंतर्गत प्रस्तावीत करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्रकरणी केंद्र शासनाचे(CAPEX) अन्वये केंद्र शासनाने राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन 2025-26 मधिल भाग - 3 ते भाग-12 बाबत सविस्तर मार्गदर्शन सुचनानुसार या भागांमध्ये केंद्रशासनाने नमुद केलेल्या सुधारणा (Reforms) करुन या बाबत अहवाल विहित वेळेत केंद्र शासनाच्या विभागांना सादर करावयाचा आहे.तसेच या सुधारनांच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडुन राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन रक्कम प्राप्त होऊ शकते.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | Supply, Installation Testing and Commissioning of 15MW Grid connected Solar Roof Top Power Generating OPEN ACCESS | १३० कोटी |

| | | |
|---|---|---|
| | System at Gat No.62/1 Avdhan ,Dhule. | |

धुळे महानगरपालिका मार्फत अवधान गट नं.62/1 MIDC जलाशय परिसरात 15 मे. वॅट क्षमतेच्या सोलार प्रकल्प उभारण्या करीता प्रकल्पसाठी आवश्यक असलेल्या जागेचे सर्वेक्षण करुन जागेची उपलब्धता तपासणी 75 एकर जागा उपलब्ध आहे.सदर जागा हेक्टर 26.63 ही आयुक्त धुळे महानगरपालिका,धुळे यांचे नावे आहे.सदरील प्रकल्पाचे अंदाजपत्रक MEDA कार्यालयाच्या तांत्रिक मंजुरी साठी पाठविले येणार आहे,सदरील जागेच्या सर्वेनुसार उक्त जागेत झाडे आहे. सदरील झाडे तोडणे करीता वृक्ष प्राधिकरणाची परवाणगी घेऊन कार्यवाही करणे योग्य होईल. करीता वरील शासन निर्णयाच्या अधिन राहुन 15 मे.वॅट सौर ऊर्जा प्रकल्पास येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त करुन घेण्याकरीता प्रकरण अवलोकन होऊन पुढिल आदेशास्तव सादर.केंद्र शासनाने राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन 2024-25 अंतर्गत तसेच शासन निर्णय क्र.संकीर्ण 2025 /प्र,क्र 19 /नवि -16 ( ई 931964 ) मंत्रालय 4000 032 दि.29 एप्रिल 2025 च्या नुसार वीज देयकात बचत करण्यासाठी सौर उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत धोरण निश्चित करणे बाबतच्या निर्णयानुसार निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्याचे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, शासन निर्णयाच्या निर्देशाप्रमाणे मनपा मालकिच्या अवधान गट नं. ६२/१ च्या जागेत १५ मेगावॅट तथा जागेच्या उपलब्धतेनुसार अधिकतम क्षमतेचा सौर उर्जा प्रकल्प उभारणीकरीता तसेच टप्पा क्रमांक २ वरखेडीरोड येथील कचरा डेपोच्या उपलब्ध होणाऱ्या जागेवर सौर प्रकल्प उभारणीकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यासाठी सदर प्रस्ताव केंद्र शासनाने राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन २०२५-२६ अंतर्गत भाग ५ औद्योगिक वाढीसाठी चालना अंतर्गत निधी मागणीसाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२५/प्र.क्र.१९/नवि-१६ (ई९३१९६४) मंत्रालय ३२ दि.२९ एप्रिल २०२५ च्या नुसार विज देयकात बचत करण्यासाठी सौर उर्जा प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावास अर्थसहाय्य मिळणेकरीता प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे सादर करण्यासा मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे सौर उर्जा प्रकल्पासाठी महापारेषण तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगीक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याकामी महाउर्जा कडील सुचिकृत तज्ञ किंवा निविदा कार्यवाही करुन तज्ञ सल्लागार नेमण्यास मान्यता वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५१ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये वाढीव हद्दीच प्रारुप विकास योजना आराखडा हस्तांतरीत करुन प्रसिध्द करणेबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.नगररचनाकार धुळे मनपाचा वाढीव हददीचा विकास आराखडा तयार करण्याचे काम झाले आहे व मागील महासभेत सादर केला आहे. त्याचे अवलोकन केले असता तो योग्यप्रकारे तयार करण्यात आला आहे तसेच वाढीव हददीची 2047 पर्यंतची लोकसंख्या विचारात घेवुन तसेच मनपाचे औद्योगिक, वाणिज्य व येणारी रेल्वेलाईन याबाबत विचार करुन नागरीकांना सुविधा पुरविणे तसेच मनपाचा सुविधा तेथे विचारात घेण्यात आला आहे. त्यादृष्टीने हा विकास आराखडा नियोजनपुर्ण केल्याचे प्राथमिकदृष्टया लक्षात येते. सगळेच आरक्षणे शासकीय जागांवर करणे शक्य नाही म्हणुन काही आरक्षणे खाजगी जागांवर देखील प्रस्तावित करण्यात आले आहे. भविष्यात केंद्र व राज्य शासनाकडुन अनुदान मिळवुन ते आरक्षण विकसीत करणेचा प्रयत्न मनपा करणारच आहे.तथापी हा विकास आराखडा लोकांना कळावा यासाठी एमआरटीपीचे कलम 26 अन्वये प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. तरी माझी मे. महासभेस विनंती आहेकी, प्रसिध्दी करणेस मान्यता मिळावी व पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळावी यास्तव सादर

मा.आयुक्त तथा प्रशासक निश्चीतच मागील महासभेत टाऊन प्लॅनिंगचे विशेष घटक आहे ही डीपी बनविणारे त्यांनी विकास आराखडा आपल्याकडे हस्तांतरीत केला होता. मनपाने आपल्या काही मागण्या सांगीतल्या होत्या त्या आल्याच होत्या यामध्ये ज्या बेसिक ॲमिनीटी नागरीकांना देणे आवश्यक आहे त्या हिशोबाने ही हददवाढीची 11 गावे मनपात समाविष्ट झाली. या गावांना डीपी नव्हता आधी किंवा रिजनल प्लॅनचा हे भाग नव्हते. आता आपण आरक्षण टाकली आहेत. एमआरटीपी च्या कलमाप्रमाणे किंवा नविन UDCPR आले त्यामधल्या सगळयांचा अंतर्भाव होवुन त्या 11 गावांचा विकास व्हावा. आपल्याला माहित आहे हे भाग हायवेला कनेक्टेड आहे. बाळापुर मध्ये नविन रेल्वेलाईन येते आहे. त्याचे जमिन अधिग्रहण सुरु आहे. भविष्यात विकासासाठी काय काय करता येईल. या गोष्टींचा अंतर्भाव आराखडयात आहे. जवळजवळ 136 च्या आसपास आरक्षण या गावांमध्ये ठेवली आहे. आपला प्रवास असा राहिला आहे ज्या सरकारी जागांवर जिथे शक्य आहे तेथे आरक्षण टाकता येतील. काही खाजगी जागांवर त्याचा भार येवु नये आणि आपले पुर्वीचे जे लेआऊट मंजुर झाले होते त्यामध्ये ॲमिनिटीज ऑलरेडी ठेवलेल्या होत्या. ती आरक्षणच असतात. या ॲमिनिटीज जास्तीत जास्त एक्सप्लॉईट करण्याचा प्रयत्न केला आहे. दहनभुमी व दफनभुमी असेल सोबत फायर फाईटिंगचे रिक्वायरमेंट असतील काही शाळांची रिक्वायरमेंट असेल त्या सगळया स्वरुपाची आरक्षण या 11 गावांमध्ये टाकल्याचा प्रयत्न केला आहे. हायवे कनेक्टीव्हीटी, रेल्वेलाईन डीएमआयसी आणि बऱ्याच गोष्टींचा अंतर्भाव केला आहे. बाळापुरचा ॲलॉग द रेल्वे लाईन रुट आहे.तो सगळा जो डेव्हलपमेंट झोन आहे. स्टेशनच्या दोनही बाजुला पार्किंग आरक्षण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सोबत वेअर हाऊस टाकता येतील का याचा पण प्रयास आपण ठेवला आहे. त्यानंतर एक लॉजिस्टिक पार्क आपल्याला घ्यायचा आहे. त्याचे आरक्षण आपण ठेवल आहे. पिंप्रीच्या जागेवर एक ड्रायपोर्ट च आरक्षण आपण ठेवत आहोत. या जागांमध्ये प्लॅनिंग ॲथोरीटी, डेव्हलपमेंट ॲथोरिटी मनपाच राहील. भविष्यात केंद्राच्या वेगवेगळया योजना आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड मध्ये खुप मोठया प्रमाणावर निधी आपल्याला मिळतो याचाच एक भाग म्हणुन सोलरचा विषय केला तो याच योजनेचा भाग होता. या योजनांमधुन भविष्यात मोठया प्रमाणावर निधी मनपाला मिळु शकतो. हे विचारात घेवुन पुढील 20 वर्षाची रिक्वायरमेंट लक्षात घेवुन औद्योगिक विकास असेल किंवा लॉजिस्टीक हब म्हणुन जेव्हा हे डेव्हलप होईल. धुळे तेव्हा हे रिझर्वेशन तेथे असण आवश्यक आहे. म्हणुन हे ठेवण्याचा प्रयत्न आपण केला आहे.. यांनी दिलेल्या व्यतीरीक्त ही ॲड ऑन रिझर्व्हेशन आहे. हे करतांना एनए झालेल्या जागा किंवा नव्याने एनए होऊ घातलेल्या जागा त्या ठिकाणी पण काही आरक्षण येतील किंवा काही येणार नाही हे ती परिस्थिती बघुन ठेवल आहे. नकाणे तलावाच्या ठिकाणी बोटींग किंवा वॉटर स्पोर्टसचे आरक्षण ठेवतो आहोत. इरिगेशन जी जागा आहे त्या ठिकाणी पण ॲम्युझमेंट पार्क जे आरक्षण ठेवतो आहोत. ही आरक्षण ठेवण्याचा हेतु असा की त्या भागातील डेव्हलपमेंट त्या हिशोबाने होईल. त्याचा

फायदा धुळेकर नागरीकांना होईल. 2045 पर्यंत ही आरक्षण एक्झीक्युट होणार आहेत. आता प्रस्तावित केले त्याप्रमाणे सेक्शन 26 खाली याचे नोटीफिकेशन ला पाठवावे. सोबत पेपर पब्लिकेशन करावे. नकाशे लोकांना उपलब्ध करावे, बघण्यासाठी या सर्व रेकमेंडेशन या ठरावाचा पार्ट करुन नविन नकाशा डेव्हलप करावा, प्रसिध्द करावा. हे नकाशे महिनाभर नागरीकांसाठी उपलब्ध असणार आहे. टाऊन प्लॅनिंगचे ऑफिस येथे ही नकाशाची प्रत लावावी. तसेच कलेक्टर ऑफीस येथे ही प्रत लावावी. आणि मनपात या 3 ठिकाणी प्रसिध्द करावी. 1 महिन्याचा अवधी राहिल. सुचना हरकतींसाठी येणाऱ्या हरकती व सुचनांवर पुढील कारवाई करता येईल. हे सर्व एकत्रित करुन त्याचा ठराव करावा.सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५१ दिनांक ०६/०५/२०२५**

नगर रचना अधिकारी, विकास योजना - धुळे (वाढीव हद्द) यांचेकडील पत्र क्र. ०२, दि. १५/०४/२०२५ चे पत्र प्राप्त झाले असून, त्यांनी धुळे महानगरपलिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राची तयार केलेली प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम २६(१) नुसार प्रसिध्दीसाठी धुळे महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. याबाबत महासभा ठराव क्र. १४३ दिनांक २३/४/२०२५ अन्वये आवश्यक त्या सुधारणांसह प्रस्ताव फेर सादर करणेबाबत निर्णय घेण्यांत आलेला होता त्यानुसार खालील प्रमाणे सुधारणा तथा सुचनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शहरातील मोराणे शिवारातील नकाने तलाव परिसर हा नागरिकांच्या व खास करून लहान मुलांच्या सहली करता तसेच मनोरंजनाच्या दृष्टीने विकसित व्हावा याकरिता तेथे भविष्यात बोट क्लब व अम्यूझमेंट पार्क विकसित करणे योग्य आहे. त्याबाबत आवश्यक सुधारणा विकास आराखड्यात कराव्या.

शहराचे भविष्यातील औद्योगिक व वाणिज्य विकसन क्षमता पाहता, वाढीव हद्दीमधील प्रस्तावित रेल्वे मार्ग तसेच मुंबई दिल्ली इंडस्ट्रियल कॉरिडोर वरील ताण पाहता विकास आराखड्यात लॉजिस्टिक पार्क करिता आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि, सदर आरक्षणांचे क्षेत्र हे वाढवणे आवश्यक आहे तसेच मल्टी लेवल पार्किंगसाठी आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

त्यानुसार, प्रारुप विकास योजनेत खालील प्रमाणे बदल सुचविण्यात येत आहेत.

(i) मौजे नगाव येथील आरक्षण क्र. १० "लॉजिस्टिक पार्क" चे क्षेत्र गट क्र. २४४ मध्ये वाढविण्यात यावे तसेच आरक्षणाचे नाव "लॉजिस्टिक पार्क / वेअर हाउस" असे करण्यात यावे.

(ii) मौजे बाळापुर येथील आरक्षण क्र. २४ "शॉपिंग सेंटर व पार्किंग" चे क्षेत्र गट क्र. १६५ व १६७ मध्ये वाढविण्यात यावे.

(iii) मौजे बाळापुर येथील आरक्षण क्र. २५ "लॉजिस्टिक पार्क" चे क्षेत्र वाढविण्यात यावे तसेच आरक्षणाचे नाव "लॉजिस्टिक पार्क / वेअर हाउस" असे करण्यात यावे.

(iv) मौजे बाळापुर येथे "मल्टी लेवल पार्किंग" करिता गट क्र. १६७, १६८ व १६९ मध्ये आरक्षण प्रस्तावित करावे.

(v) मौजे बाळापुर येथे "Dry Port" साठी रेल्वे मार्गा लगत गट क्र. ३५, ४४, ४५, ४६ व ४७ मध्ये आरक्षण ठेवावे.

(vi) मौजे पिंपरी येथील आरक्षण क्र. ४४ "लॉजिस्टिक पार्क" चे क्षेत्र गट क्र. २ मध्ये वाढविण्यात यावे तसेच आरक्षणाचे नाव "लॉजिस्टिक पार्क / वेअर हाउस" असे करण्यात यावे.

(vii) मौजे अवधान येथील आरक्षण क्र. ४५ “लॉजिस्टिक पार्क” चे क्षेत्र उत्तरेस वाढविण्यात यावे तसेच आरक्षणाचे नाव “लॉजिस्टिक पार्क / वेअर हाउस” असे करण्यात यावे.

(viii) मौजे अवधान येथील गट क्र. ८०, ८१ व ८२ येथील मंजूर रहिवास अभिन्यासांना Buffer zone ठेवण्याच्या दृष्टीकोनातून तसेच लगत मंजूर मूळ हद्दीच्या विकास योजनेतील प्रस्तावित रहिवास विभागाचा विचार करता, गट क्र. ७३ च्या पश्चिम हद्दीच्या पूर्वेकडील व प्रस्तावित १५ मी. पूर्व-पश्चिम रस्त्याच्या उत्तरेकडील गट क्र. ७३ व ८० मधील प्रस्तावित औद्योगिक विभागाच्या ठिकाणी रहिवास विभाग प्रस्तावित करण्यात यावा.

(ix) मौजे मोराणे येथील गट क्र. ६२ मध्ये “बोट क्लब” व “अम्यूझमेंट पार्क” करिता आरक्षणे प्रस्तावित करण्यात यावी.

(x) मौजे नकाणे येथील गट क्र. ३५ मधील आरक्षण क्र. १०३ “Edu. Facility” हे गट क्र. १३० च्या मंजूर अभिन्यासातील खुल्या जागेत व सुविधा क्षेत्रात तसेच १०४ “प्ले ग्राउंड” हे गट क्र. १५९ च्या मंजूर अभिन्यासातील खुल्या जागेत स्थलांतरित करावे.

सदरचे बदल दर्शवून, प्रारुप विकास उक्त अधिनियमाचे कलम २६(१) नुसार प्रसिध्द करण्यास या ठरावाव्दारे मान्यता देण्यांत येत आहे.

१.उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये धुळे महानगरपलिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारूप विकास  योजना प्रसिध्द झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतदारांना सुनावणी देण्यासाठी अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये गठीत होणाऱ्या नियोजन समितीवर महानगरपालिकेच्या स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने, मा. आयुक्त तथा प्रशासक यांची सदस्य म्हणुन नेमणुक करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

२.तसेच भविष्यात केंद्रीय अर्थ सहाय्य योजना तसेच राज्य शासनामार्फत अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यास प्रस्तावित केलेली लॉजिस्टीक पार्क या सारखी आरक्षणे यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढीकरीता मदत होऊ शकते सदर आरक्षणे धुळे महानगरपालिकेमार्फत विकसित होतील याबाबतची नियोजन प्राधिकरण (PLANNING AUTHORITY) धुळे महानगरपालिका राहील.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने पुढील प्रशासनीक कार्यवाही करणेस ही सभा मान्यता वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**